पोलीस अधीक्षक कार्यालय, बुलढाणा.
स्टेट बँक ऑफ इंडिया चौक, ता. व .जि. बुलढाणा - ४४३००१
Email-sp.buldhana@mahapolice.gov.inदुरध्वनी क्र. ०७२६२-२४२१०१ फॅक्स क्र.०७२६२-२४२२४६

# प्रसिध्दीपत्रक

## बुलढाणा जिल्हा पोलीस शिपाई भरती 2022-2023

## दिनांक 13.07.2024 रोजी सहकार विद्या मंदीर, चिखली रोड, बुलडाणा येथे घेण्यात येणाऱ्या पोलीस शिपाई पदाच्या लेखी परीक्षेच्या अनुषंगाने

## उमेदवारांना सुचना

***********

पोलीस अधीक्षक बुलढाणा या आस्थापनेवर सन 2022-23 मध्ये रिक्त असलेल्या 125 पोलीस शिपाई पदांकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातीच्या अनुषंगाने दिनांक 19/06/2024 ते 01/07/2024 या दरम्यान उमेदवारांची शारिरीक मोजमाप चाचणी/ मैदानी चाचणी घेण्यात आली आहे. त्यामध्ये उमेदवारांना मिळालेल्या गुणांच्या आधारे मैदानी चाचणीत किमान 50 टक्के गुण प्राप्त करणारे उमेदवार यांचे गुणांच्या गुणवत्तेनुसार संबंधीत प्रवर्गातील जाहिरातीत नमुद केलेल्या रिक्त पदांच्या 1:10 या प्रमाणे पात्र असलेले एकुण 1366 उमेदवारांची निवड यादी खालील नमुद माध्यमाद्वारे प्रकाशित करण्यात आलेली आहे.

1. www.buldhanapolice.gov.in
2. जिल्हा पोलीस नियंत्रण कक्ष, बुलढाणा येथे नोटीस बोर्डावर
3. पोलीस मुख्यालय बुलढाणा येथे नोटीस बोर्डावर

तरी बुलढाणा जिल्हा पोलीस दलाची पोलीस शिपाई पदाची लेखी परीक्षा ही दिनांक 13.07.2024 रोजी सहकार विद्यामंदीर, चिखली रोड, बुलडाणा येथे सकाळी 10.00 ते 11.30 या वेळेत घेण्यात येणार आहे. त्यानुसार उमेदवारांची परीक्षा केंद्रावर बायोमॅट्रीक पध्दतीने हजेरी घेण्यात येणार असुन उमेदवारांनी 03 (तीन) तास अगोदर म्हणजेच सकाळी 07.00 वा. परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक राहील. तसेच उमेदवारांनी आवेदन अर्ज, प्रवेश पत्र व स्वत:ची ओळख पटविण्यासाठी लगताचा फोटो असलेले आधार कार्ड / पॅन कार्ड / वाहन परवाना / मतदान कार्ड सोबत आणावे.

सदर लेखी परीक्षा ही अत्यंत पारदर्शकपणे व नि:पक्षपातीपणे होणार असुन त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार होणार नाही तसेच उमेदवारांनी प्रवेश करण्यापुर्वी मोबाईल /इलेट्रॉनिक्स किंवा तत्सम प्रकारचे उपकरणे व इतर साहित्य परीक्षा केंद्रामध्ये घेऊन येऊ नये / सोबत बाळगण्यात येऊ नये याबाबत दक्षता घ्यावी. सदर लेखी परीक्षेचे अनुषंगाने बुलडाणा जिल्हा पोलीस दलातील गोपनिय यंत्रणा कार्यन्वीत राहणार असुन उमेदवारांनी कोणत्याही प्रलोभणास / अमिषास बळी पडु नये, व कोणताही गैरप्रकार होत असल्याचे निर्दशनास आल्यास त्याबाबतची माहिती प्रत्यक्ष अवगत करुन दयावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाचे वतीने करण्यात येत आहे.

पोलीस अधिक्षक यांचे कार्यालय बुलढाणा

(सुनिल कडासने)
पोलीस अधीक्षक, बुलढाणा

Corrs22024